# बृहन्मुंबई महानगरपालिका

सार्वजनिक आरोग्य खाते

## <u>जाहिरात</u>

सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे पॉलिक्लिनिक व डायग्नॉस्टिक केंद्र तसेच हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना येथे संगणक सहाय्यक कंत्राटी (DEO) यांची प्रथम सहा महिन्यांसाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्याकरीता अति.आयुक्त महानगरपालिका यांची क्र.अति.आयुक्त.(प.उ)/डी/2839/08.12.2022 अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे. त्याकरीता खालील पदे कंत्राटी तत्वावर भरण्याकरीता दि.**13.03.2023** ते **15.03.2023** या कालावधीत गुगल फॉर्मद्वारे ऑनलाईन स्वीकारले जातील.

याची सविस्तर माहिती व अर्जाचा नमुना खालील प्रमाणे आहे.

<u>शैक्षणिक अर्हता</u> **:-**

- उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.
- उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेली मराठी विषय (उच्चस्तर / निम्नस्तर) घेऊन उत्तीर्णझालेला असावा.
- उमेदवाराने संगणक वापराबाबतचे MS-CIT (3 महिने अथवा त्यापेक्षा जास्त कालावधीचा असावा) शासन मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेमधून उत्तीर्ण केलेला असावा व याबाबतचे महाराष्ट्र राज्य शासनाचे प्रमाणपत्र उमेदवाराकडे असणे अनिवार्य आहे.
- उमेदवाराने मराठी ३० श.प्र.मि. व इंग्रजी ४० श.प्र.मि. टंकलेखन शासन मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेमधून उत्तीर्ण केलेला असावा व याबाबतचे महाराष्ट्र राज्य शासनाचे प्रमाणपत्र उमेदवाराकडे असणे अनिवार्य आहे. डेटा एन्ट्रीचा वेग कमीतकमी ८००० की डीप्रेशन्स इतका अवगत असावा.
- एम.एस.वर्ड, एक्सेल व मुलभूत सांख्यिकिय तंत्राच्या संगणक प्रणालीची माहिती असावी.
- बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोविड-19 कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या / शासनाच्या रुग्णालय / कोविड केअर सेंटर मध्ये किमान ६ माहिने काम केलेल्या उमेदवारास अधिक गुण दिले जातील.

<u>वयोमर्यादा</u> **:-** उमेदवाराचे वय दिनांक 01 मार्च 2023 रोजी 45 वर्षापेक्षा अधिक असू नये.

<u>मानधन</u> **:-** रु.१८,०००/- ( अठरा हजार रुपये फक्त )

गुगल फॉर्म लिंक https://forms.gle/hn8hPi67ThnxSfAM7 अर्ज बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर https://portal.mcgm.gov.in उपलब्ध होईल.

(शैक्षणिक अर्हता पात्र उमेदवारांची परीक्षा घेतली जाईल.)

सही **/-**

कार्यकारी आरोग्य अधिकारी